पुणे पोलीस

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

प्रेसनोट क्र. ३११५ दि. २८ /०९ /२०१९

**उत्तमनगर पोलिस स्टेशन**

**हिंदु-मुस्मील विवाहामुळे दुंभगलेली कुंटुबे उत्तमनगर पोलीसांनी आणली एकत्र.**

ते दोघे राहणेस शेजारी शेजारी होते. दोघांचे एकमेंकावर निंतांत प्रेम होते. दोघांचे लग्नाचे वय ही पुर्ण झाले होते. मात्र दोंघाचें विवाहाकरीता दोन्ही कुंटुबाचा विरोध होता. कितीही समजावुन सांगीतले तरी कोणीच ऐकेणा मात्र प्रेम काही त्यांना वेगळे होवू देई ना. ते दोघे घर सोडुन पळुन गेले. त्यांनी नोंदणी पध्दतीने विवाह केला. तो पर्यन्त हिंदु मुस्लीम मुलगा मुलगी पळुन गेले म्हणून दोन्ही समाजात खळबळ माजली. दोन्ही कुंटुबाचे लोक त्यांना शोधु लागले. मुलीच्या घरच्यांनी मुलगी हरवली बाबत उत्तमनगर पोलीस ठाणेत तक्रार नोंदवली. सयुंक्त तपास सुरु झाला व उत्तमनगर पोलीसांनी दोघांना ताब्यात घेवून पोलीस ठाणेत आणले व कुंटुबासमोर हजर केले. दोंघांनी विवाह केला आहे हे समजताच सैराट चित्रपटाची पुनरावृत्ती करण्याची भाषा कुंटुबिय करु लागले . त्यावेळी मात्र सुरु झाली पोलीसांची सामाजीक बांधीलकी. दिलेल्या तक्रारीप्रमाणे मुलगी मिळुन आली तुमची तक्रार संपली आमचे काम संपले असे न समजता पोलीसांनी दोन्ही कुंटुबाना बसवून त्यांना चहा मागवला .त्यांची डोकी शांत केली. त्यांना समुपदेशन केले. मुलीचे व मुलाचे एकमेंकावर प्रेम आहे ते सज्ञान आहेत. त्यांनी कायदेशिर पध्दतीने लग्न केलेले आहे. या दोन्ही नवविवाहींता काही झाल्यास त्यांचे कुंटुबास जबाबदार पकडु. जातीयवाद सोडुन दया. व एकत्र या आपण २१ व्या शतकात आहोत. असे सांगताच ते दोन्ही कुंटुंबिय शांत झाले काही वेळाने ते रडु लागले. त्यांनी दोन्ही मुलांना आपल्या कवेत घेतले . त्यांना आशिर्वाद दिले. दोन्ही कुंटुबानी पेढे आणुन पोलीसांना वाटले व पोलीसांचे आभार मानले. आज रोजी दोन्ही कुंटुब व नवविवाहीत जोडपे सुखरुप व खुशीत आहेत.

वरील कामगीरी हि उत्तमनगर पोलीस ठाणेचे पोलीस हवा आर बी देडगे. पो हवा पुनाजी किरवे, मपोशि जयश्री निमगीरे, शितल गळवे, संध्या जाधव यांनी ही कौतुकास्पद कामगीरी केली आहे. उत्तमनगर पोलीस पोलीस निरीक्षक सतिश डहाळे यांनी सर्व टिमचे मनापासुन कौतुक केले आहे. नागरीकांनी ही पोलींसाच्या कामाचे कौतुक केले आहे.